प्रेस नोट दिनांक २७/०७/२०२२

| | |
|---|---|
| अेसीबी | रत्नागिरी युनिट |
| आरोपी लोकसेवक | श्री. संजय बबन दळवी, वय ४१, ग्रामसेवक ग्रामपंचायत परुळे ता. राजापुर जि. रत्नागिरी सध्या रा. नारकर चाळ, सरस्वती विद्यामंदीर हायस्कुल समोर पाचल ता. राजापुर जि. रत्नागिरी |
| घटनेचे ठिकाण | पाचल बाजारपेठ येथील तक्रारदार यांचे कार्यालयामध्ये |
| तक्रार अर्जातील लाचेची रक्कम | ३,०००/-रुपये |
| मागितलेली लाचेची रक्कम | ३०००/- रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | स्विकारलेली लाचेची रक्कम ३,०००/- रुपये |
| थोडक्यात हकिगत | यातील तक्रारदार हे राहत असलेले घर त्यांचे आजोबा यांचे नावावरुन त्यांचे वडील यांचे नावावर होण्याकरीता ग्रामपंचायत परुळे यांचेकडे अर्ज सादर केला होता. सदरचे घर त्यांचे आजोबंच्या नावावरुन त्यांचे वडील यांचे नावावर करुन त्या घराचा ऑफलाईन व ऑनलाईन दोनीही असेसमेन्ट उतारा देण्याकरीता लोकसेवक श्री. संजय बबन दळवी, ग्रामसेवक ग्रामपंचायत परुळे यांनी तक्रारदार यांचेकडे ३,०००/-रुपये लाच रक्कमेची मागणी केली म्हणुन तक्रारदार यांनी लोकसेवक श्री. संजय दळवी यांचेविरुध्द अॅन्टी करप्शन ब्युरो, रत्नागिरी येथे दिनांक १४/०७/२०२२ रोजी लाच रक्कमेच्या मागणीची तक्रार दिलेली आहे.<br>सदर तक्रारीचे अनुषंगाने दिनांक १४/०७/२०२२ रोजी केलेल्या पडताळणी कारवाई मध्ये लोकसेवक श्री. संजय दळवी यांनी तक्रारदार राहत असलेले घर त्यांच्या वडीलांच्या नावे करुन त्या घराचे ऑफलाईन व ऑनलाईन दोनीही असेसमेन्ट उतारा देण्याकरीता ३०००/- रुपये लाच रक्कमेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.<br>पडताळणीमध्ये निष्पन्न झालेनुसार तक्रारदार यांचे आजोबांच्या नावावरील घर तक्रारदार यांच्या वडीलांचे नावावर करुन ऑफलाईन असेसमेन्ट उतारा दिल्यानंतर त्याच असेसमेंट उता-याची ऑनलाईन प्रत देण्याकरीता सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक दळवी यांनी लाच रक्कमेची मागणी करुन ती स्विकारण्याचे मान्य केले व मागणी केलेली लाच रक्कम ३०००/- रुपये तक्रारदार यांचेकडुन दिनांक २७/०७/२०२२ रोजी ११.३२ वाजता पाचल बाजारपेठ येथील तक्रारदार यांचे कार्यालयात पंचांसमक्ष स्विकारल्यानंतर त्यांना नारकर चाळ, पाचल येथील त्यांचे राहते घराचे बाहेरुन पंचांसमक्ष ताब्यात घेण्यात आले आहे. |

अॅन्टी करप्शन ब्युरो, रत्नागिरी तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणताही शासकिय अधिकारी/कर्मचारी किंवा त्याचे वतीने खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया अॅन्टी करप्शन ब्युरो, रत्नागिरी कार्यालयाशी खालील कमाकावर संपर्क साधावा

**Toll Free No** :- 1064
**Telephone No** :- 02352/222893
**Office email** :- dyspacbratnagiri@mahapolice.gov.in
**Website** :- www.acbmaharastra.gov.in
**Mobile App** :- www.acbmaharastra.net
**Facebook Page** :- www.facebook.com/MaharastraACB

पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी

प्रविण आ.ताटे
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग रत्नागिरी.